<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर जादा सरतपास श्री. बी.एस. शिंदे विधीज्ञ शपथेवर सुरु ःः-</u>

मी या पूर्वी प्रतिज्ञापत्रावर पुरावा सादर केला आहे. आरोपीने मुलाच्या फिस साठी व वडीलांच्या औषधोपचारासाठी माझ्याकडून आरोपीने दोन लाख रुपये घेतले होते. त्या परतफेडीसाठी त्यांनी मला दोन लाख रुपायाचा चेक लिहून दिला. मला आता निशाण ०३ च्या यादीस अनुकमांक १ वर चा बॅक ऑफ महाराष्ट्राचा तारीख ०६.०६.२०२३ रोजीचा रक्कम रुपये दोन लाख रुपयाचा चेक दाखविला. तो तोच आहे. त्यावर आरोपची सही आहे. त्यातील मजकूर त्यांने लिहून तो मला दिला. त्याला **निशाण २९** देण्यात आला. मी तो चेक वटण्यासाठी आय.डी.बी.आय. बॅकेत भरला होता. मी त्याबद्दलची पावती मी या केसच्या कामी दाखल केली. मला ती दाखविली ती तीच आहे. तिला **निशाण ३०** देण्यात आला. चेक न वटता परत आलेल्याने बॅकेने मला मेमो दिलेला तो १२ जुलै, २०२३ चा मेमो मला दाखविला तो तोच आहे. त्याला **निशाण ३१** देण्यात आला. दि. २०.०७.२०२३ ला मी आरोपीला लेखी नोटीस पाठविली होती. त्या नोटीस ची स्थळप्रत या केसच्या कामी दाखल केली आहे. नोटीस मधील मजकूर मी वकील साहेबांना सांगितला होता. त्यावर वकीलांची व माझी सही आहे. तिला **निशाण ३२** देण्यात आला. मी आरोपीला दोन नोटीस पाठविल्या. एक भाडगाव ता. लातूर येथील त्याच्या पत्त्यावर व दुसरी उदयगीरी कॉलेज या त्यांच्या नौकरी पत्त्यावर पाठविल्या. भाडगाव येथील नोटीस त्या पत्त्यावर राहत नाहीत म्हणून मला पुन्हा परत प्राप्त झाली. तर कॉलेजच्या पत्त्यावर पाठविलेली नोटीस आरोपीला प्राप्त झाली. भाडगाव वरुन परत आलेला लिफाफा मी

या केसच्या कामी दाखल केला आहे. मला तो दाखविला तो तोच असून तिला **निशाण ३३** देण्यात आला. आरोपीला नोटीस मिळाल्याचे हे दाखविण्यासाठी मी पोस्टाचा दाखला दाखल कला असून तो मला दाखविला. तो तोच असून त्याला **निशाण ३४** देण्यात आला. मी आरोपीला पोस्टाव्दारे नोटीस पाठविली हे दाखविण्यासाठी पोस्टाच्या दोन पावत्या दाखल केल्या आहेत. मला त्या दाखविल्या. त्या त्याच असून त्यांना **निशाण ३५ व ३६** देण्यात आला.

**( साक्षीदार यांचा उलटतपास आरोपी तर्फे श्री आर.एम. पाटील विधीज्ञ यांचा पुकारा केला असता अनुपस्थीत राहल्याने उलटतपास नाही.)**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.01.21
12:26:24 +0530

दिनांकः- १९.०१.२०२६

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर